**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २५४** **दिनांक :- १४/०९/२०२१**

# दिवसा घरफोडी करणा-या आंतरराज्यीय टोळीस अटक करुन ३ गुन्हयातील रु. ६,१२,९००/- किंमतीचे सोने-चांदिचे दागिने हस्तगत-माणिकपुर पोलीस ठाणे यांची कामगिरी.

माणिकपूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ३०/०८/२०२१ रोजी अंबाडी रोड या ठिकाणी दिवसाची घरफोडी झाली होती. माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने सलग ६ दिवस घटनास्थळावरील पुरावे हस्तगत करून व तांत्रिक मदतीच्या आधारे आरोपींच्या राहण्याचे ठिकाण शोधले. त्यानंतर सलग दोन दिवस आरोपींवर पाळत ठेवुन सापळा रचुन एकुण पाच आरोपी १) अभिषेक कामेश्वर सिंग, वय २४ वर्षे, धंदा- नाही, रा. गाव व पो. गुलाबबाग, ठाणा- सदरसिटी, जि. पुर्णीया, राज्य- बिहार. २) मोहमंद तुफेल मोहमंद जलाल, वय २६ वर्षे, धंदा- नाही, रा. गाव व पो. गुलाबबाग, ठाणा- सदरसिटी, जि. पुर्णीया, राज्य- बिहार. ३) रंजीत दशरथ सहानी, वय ३८ वर्षे, धंदा- नाही, रा. गाव व पो. गुलाबबाग, ठाणा- सदरसिटी, जि. पुर्णीया, राज्य- बिहार. ४) आशिषकुमार अमोल यादव, वय २२ वर्षे, धंदा- नाही, रा. गाव व पो. गुलाबबाग, ठाणा- सदरसिटी, जि. पुर्णीया, राज्य- बिहार. व ५) बिरु रामविलास पासवान, वय २६ वर्षे, धंदा- नाही, रा. गाव व पो. गुलाबबाग, ठाणा- सदरसिटी, जि. पुर्णीया, राज्य- बिहार यांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी घरफोडी करुन चोरी केलेली मालमत्ता आरोपी नामे संतोष भिवा पाटील, वय ४६ वर्षे, धंदा- रिक्षाचालक, रा. विठ्ठल मंदीराच्या समोर, विठ्ठलवाडी, पो. विरातन बुद्रुक, ठाणा- सफाळे, ता.जि. पालघर याच्यामार्फत विक्री केल्याचे सांगितल्याने एकुण १५७ ग्रॅम सोन्याच्या वस्तु, ५१० ग्रॅम चांदीच्या वस्तु व रु. ७००/- रोख रक्कम असे एकुण अं.कि.रु. ६,१२,०००/- किंमतीच्या वस्तु हस्तगत करण्यात आल्या आहेत.

सदर आरोपींकडून माणिकपुर पोलीस ठाणेचे खालील ३ गुन्हे उघडकीस आणण्यात आले आहेत.

| अ.क्र. | गु.र.क्र. व कलम |
|---|---|
| १. | गु.र.क्र. ३३७/२०२१ कमल ४५४, ३८०, ३४ भा.दं.वि. |
| २. | गु.र.क्र. ४२/२०२१ कमल ४५४, ३८० भा.दं.वि. |
| ३. | गु.र.क्र. ४७/२०२१ कमल ४५४, ३८० भा.दं.वि. |

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २, वसई, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मार्गदर्शनाखालील श्री. भाऊसाहेब आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे, पो.नि. अभिजित मडके (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि. श्री. सचिन सानप, पो.उ.नि. रोहिणी डोके, पो.ह. २६५/शैलेश पाटिल, पो.ना. ४८३/धनंजय चौधरी, पो.ना. १२१७/शामेश चंदनशिवे, पो.शि. ३०१/किरण आव्हाड, पो.शि. ६१२/गोपाळ कोळेकर, पो.शि. २८१/हेमंत कोरडे व म.पो.शि. २४३५/पुजा कांबळे यांनी केलेली आहे.